# मराठी भाषा अभ्यास मंडळ
## (शैक्षणिक वर्ष: २०२३-२४)

बैठक क्रमांक - ५
विभाग : मराठी
दिवस : रविवार
तारीख : २५ जून २०२३
वेळ : सकाळी ११.३० वाजता
ठिकाण : आभासी मंच - "गूगल मीट"

**सभेचे इतिवृत्त**

मुद्दा क्र. ५.०१ : मराठी भाषा आणि साहित्य विभागाच्या अभ्यास मंडळाची सभा **रविवार** दिनांक **२५ जून २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता** गूगल मीट वर आभासी मंचाद्वारे (ऑनलाईन) मराठी भाषा विभागप्रमुख प्रा.डॉ.संतोष लक्ष्मण राणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.प्रा.डॉ.संतोष राणे यांनी सभेचे प्रास्ताविक केले.

सभेला अभ्यास मंडळाचे खालील सर्व सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| डॉ.नितीन आरेकर | मा.कुलगुरू मुंबई विद्यापीठ,नामनिर्देशित सदस्य. उपप्राचार्य सीएचएम महाविद्यालय,उल्हासनगर |
| डॉ.राजेंद्र सांगळे | (बाह्य विद्यापीठ सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) |
| श्री.देवेंद्र भुजबळ | माजी संचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन |
| कु.काजल थळे | गुणवंत माजी विद्यार्थिनी. |
| डॉ.संतोष लक्ष्मण राणे | अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ, विभागप्रमुख-मराठी भाषा आणि साहित्य |
| प्रा.रुपेश यशवंत महाडीक | सदस्य मराठी विभाग |
| प्रा.राजश्री माने-जाधव | सदस्या,मराठी विभाग |

मुद्दा क्र.५.०२: प्रा.रुपेश महाडीक यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण(NEP) - २०२० नुसार होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने B.A. - मराठी आणि M.A. प्रथम वर्ष - मराठी या संदर्भातील अभ्यासक्रम,क्रेडिट्स आणि

Scanned with CamScanner

मूल्यमापन आराखडा, यांबाबत सविस्तर माहिती पीपीटी सादरीकरणाच्या माध्यमातून उपस्थित अभ्यास मंडळ सदस्यांना दिली. सदर बाबींबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सन्माननीय सदस्यांनी सदरच्या अभ्यासक्रमाला अनुमोदन देत मान्यता दिली.

मुद्दा क्र.५.०३: प्रा.राजश्री माने-जाधव यांनी जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाचे विश्वस्त मंडळ,महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ.महेश पाटील,ग्रंथालय प्रमुख प्रा.नारायण बारसे या सर्वांचे त्यांच्या मार्गदर्शनासाठी व सहकार्यासाठी मनःपूर्वक आभार मानले. तसेच अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचेही आभार मानले. अभ्यास मंडळाची सभा १२ वाजून ३० मिनिटांनी संपन्न झाली.

प्रा.डॉ.संतोष लक्ष्मण राणे
अध्यक्ष - मराठी भाषा अभ्यास मंडळ,

प्राचार्या
डॉ. सुचित्रा नाईक

V.P.M's. JOSHI & BEDEKAR COLLEGE OF ARTS & COMMERCE AUTONOMOUS ★ THANE ★

Scanned with CamScanner